

'तथापि'चा

# जिव्हाळा

प्रिय साथी,

सर्वांना नमस्कार. या वर्षातील जिव्हाळ्याचा पहिला अंक आपल्या हातात देत आहोत. उन्हाळा जसजसा पुढे सरकतो आहे तस तशी महाराष्ट्रातील दुष्काळाची परिस्थिती अधिकच गंभीर रुप धारण करत आहे. विशेषतः मराठवाड्यातील आणि प. महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांतील परिस्थिती अधिकच भयावह आहे हे सांगायला नको. विदर्भ, कोकण आणि उत्तर महाराष्ट्रातील बातम्या टीव्ही पेपरात फार दिसत नाहीत याचा अर्थ तिथं सगळं उत्तम आहे असं नाही. याच दुष्काळाशी संबंधित काही प्रत्यक्ष अनुभव त्या त्या जिल्ह्यात काम करणारे काही कार्यकर्ते इथे मांडत आहेत.

स्त्रियांवरील हिंसेशी संबंधित रोजच्या रोज बाहेर येणाऱ्या नवनव्या प्रकरणांना प्रतिसाद म्हणून माध्यमांचा उताविळपणा संपत नाही, शासनाची साचेबंद उत्तरं थांबत नाहीत, पोलिसांचं *तपास चालू आहे* चालूच रहातं, समाजाची थकलेली प्रतिक्रिया आणखी थकते. इतकंच काय हे सर्व पाहून, ऐकून तुमच्या माझ्यासारख्यांची तगमग आणि चिडचिड ही देखील सवयीची होते का काय अशी भीति वाटते.

वर्मा समितीने दिलेल्या एका चांगल्या अहवालाची अखेर सरकारने वाट लावली. आपल्या गैरसोयीच्या सूचनांना कचऱ्याची टोपली दाखवून बलात्काराला फाशी, संम्मतीने शरीर संबंधांचं वय इ. मुद्दे चर्चेत आणून त्यांनी पुन्हा एकदा कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या मूळ मुद्द्याला बगल दिली आहे. असो. या समितीने स्त्रियांच्या अधिकाकराची जी सनद आपल्या अहवालात दिली आहे तिचं भाषांतर तुमच्यासाठी देत आहोत.

शिवाय बलात्कारासारख्या विषयावर चर्चा करताना कोणते मुद्दे महत्वाचे आहेत हे मांडणारा एक उत्कृष्ट लेख आपल्यासाठी देत आहेत. कृपया आपल्या प्रतिक्रिया कळवा...

- आपली तथापि टिम




नेटवरून साभार

## अंतरंग

**मागोवा**
दुष्काळाच्या कळा..
काही अनुभव काही निरिक्षणं २
**चालू घडामोडी**
न्या. जे एस वर्मा समिती अहवाल
स्त्री हक्कांची सनद ४
**विशेष लेख**
विचार बलात्काराचा आणि त्याबाबत भूमिकांचा ७
**पारगावच्या पारावरून**
कॅशच्या आधारावर जनता गॅसवर ९

मा
गो
वा

# दुष्काळाच्या कळा!!
## काही अनुभव काही निरिक्षणं


**दुष्काळ मराठवाड्यात आहे. दुष्काळ विदर्भात आहे. कोरड्या नद्या नाले आणि धरतीच्या गर्भात आहे. दुष्काळ शेतात आहे, घरात आहे. पाटबंधारेच्या बंद फाइली आणि मंत्रालयाच्या दारात आहे. पाण्याचा दुष्काळ आहे. दाण्यांचा दुष्काळ आहे. दादा, आबा आणि राजकारण्यांचा दुष्काळ आहे. दुष्काळ रानात आहे, रानातील मूक जनांत आहे तसाच तो बधीर सरकारच्या तनामनात ही आहे. दुष्काळात डोळे सोडून कुठंच सापडणार नाही पाणी, ते भरून घेण्यासाठी शासन कधी सोडणार रेल्वेच्या वाघीणी???**
**अशा दुष्काळतील काही अनुभव आणि निरिक्षणं आमच्या वाचकांसाठी देत आहोत.**

### ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद

पडला दुष्काळ, झाळा सोसू उन्हाच्या किती?
घोटभर पाण्यासाठी वाट गं तुडवावी किती?

या वर्षी पाऊस सरासरीपेक्षा खूपच कमी झाला. आजघडीला तालुक्याच्या १०७ गावांपैकी ३५ गावात टँकर सुरू झाला आहे.

या दुष्काळाचा परिणाम स्त्रियांच्या आरोग्यावर विशेष दिसून येत आहे. रोजच्या गरजा भागवताना पाण्याचा हिशेब आणि काटकसर करकरून बाया थकून जातात. कामासाठी गावापासून पाचपंचेवीस किमीचं अंतर कापून आल्यावर घरची कामं आवरून धरणीला पाठ टेकवावी म्हटलं तर रात्री अपरात्री नळाला पाणी येईल ही धास्ती. घागरी घेऊन नळावर पाण्याच्या वाटंला नजर लावून बसायचं. जिथं नळाची सोय नाही तिथं पायपीट आहेच. नित्याचे जागरण आणि दिवसभराचे कष्ट याचा सरळ परिणाम स्त्रियांच्या आरोग्यावर दिसत आहे. लोडशेडींगमुळं पाणी कधी दिवसा तर कधी रात्री येतं. दिवसाचं पणी सरळ पोरींच्या शाळेच्या मुळावर येतं. आठवडा आठवडा पोरींना शाळा बंद, पाणी भरण्यासाठी.



जिथं थोडीफार कामं उपलब्ध आहेत तिथं मजुरांना नाडण्याचे उद्योग आहेतच. काम कमी उपलब्ध असल्यामुळे मिळेल त्या पैशात लोक मजुरी करताना दिसत आहेत. ऊस तोड कामगारांना गावाकडे यावं वाटंत नाही कारण गावात पाणीच नाही. त्यांचं म्हणणं की आम्ही इकडंच शेताशेतांत राहून पोटभर पाणी पिऊन राहात आहोत. त्यांची मुलांच्या शिक्षणावर याचा गंभीर परिणाम होणार आहे.

दुष्काळाशी लढण्यासाठी एका गावाने उपाययोजना म्हणून स्वतंत्र नळजोड बंद केली व सार्वजनिक नळ वापरण्याचा ठराव ग्रामसभेत मंजूर केला. दुसऱ्या एका गावाने एकाच जागी पाणी सोडून सर्वांनी इथूनच पाणी न्यायचे असा ठराव केला, मग कोणी कुठल्याही जाती किंवा धर्माचा असेल. ही एक चांगली गोष्ट.

अशा परिस्थितीत पाणी शुद्ध की अशुद्ध या भानगडीत कोण पडणार? शासन यावर मेडिक्लोअर वाटप किंवा विहिर-हँडपंपात क्लोरिन पावडर टाकण्यासारखे उपाय करताना आजही दिसत नाही.

बळीराम जेटे फुलवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद

### ता. निलंगा जि. लातूर

१. या गावातील एका गरोदर स्त्री ची ही कथा. दिवसभर रणरणत्या उन्हात पाण्यासाठी रांगा लाऊन वाट पाहावी लागते. पाण्याचा काही नेम नसल्यामुळे एका खेपेत जास्तीत जास्त पाणी नेण्यासाठी दोन दोन मोठाल्या घागरी उचलते. पोटदुखीचा त्रास वाटला तर नवरा म्हणतो मग दवाखान्यात जा. पण सकाळी स्वयंपाक, लेकराची शाळा यामुळे सरकारी दवाखान्याची वेळ पाळता येत नाही आणि खाजगीत जायला नवरा पैसे देत नाही.

पाण्याची रातपाळी असली तर रात्र-रात्र झोप मिळत नाही. त्याचा तिच्या आरोग्यावर परिणाम दिसत आहे. स्वयंपाकाला जरासा उशीर झालेला नवरोबांना खपत नाही, ते लगेच खवसाळून उठतात.

पोटदुखी, कंबरदुखी, पायात गोळे येणे, एचबीचं प्रमाण कमी, भूक लागत नाही इ. तक्रारी तिच्या बोलण्यातून नेहमी येता. या सगळ्यात ती मजुरीलाही जाते हे सांगायला हवंच.

२. मी सोनाली. मी मिरगावीची. मी आठवीत आहे. पाणी टंचाईमुळं दिवसदिवस पाण्यासाठी इथून तिथं भटकावं लागतं. रांगेत तासन् तास उभं रहावं लागतं. त्यामुळे मला शाळेत वेळेवर जाता येत नाही. उशीर झाला की सर मारतात. माझं शाळेत जायचं मन होत नाही. म्हणून मी शाळेला कधी कधी जात नाही. आई मजुरीला जाते म्हणून घरातील लहान मुलांनाही सांभाळण्याचं काम मलाच करावं लागतं. अभ्यासाला वेळ मिळत नाही आणि करावासाही वाटत नाही. जेवण वेळेवर नसल्यामुळे अशक्तपणा वाटतो. गर्दीत पाणी आणण्यासाठी गेलं की मुलं टिंगल टवाळी करतात.

पानफूल पाटील हत्तरगा ता. निलंगा जि. लातूर

## ता. माण जि. सातारा

जसं एखाद्या कार्यक्रमाचे मानकरी असतात तसंच की काय निसर्गानं आणि शासनानं सातारा जिल्ह्यातील माझ्या माण तालुक्याला दुष्काळाचे कायमचे मानकरी केलं आहे. आमचा संसार हा शेतावर अवलंबून व शेत पावसावर. माण-खटाव या भागात तब्बल ३ वर्षे पुरेसा पाऊस पडलेला नाही.

फक्त अन्न, पाणी व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न नाही. तिथे माणसांच्या हाताला काम नाही. तरूणमंडळी रोजगाराच्या शोधात पुणे, मुंबई सारख्या ठिकाणी गेली आहेत. काही कुटुंबांवर सोय होईल म्हणून पाणी असणाऱ्या पाहुण्यारावळ्याच्या गावी जायची पाळी आली आहे.

सरकारने जनावरांसाठी चारा छावण्या उभारून चारापाण्याची सोय केली पण ती ही तुटपुंजी आणि बरीच उशीरा. अशा परिस्थितीत जनावरांना जगवणं तर गरजेचं आहे कारण काही लोकांचा उदरनिर्वाह या गाई म्हशींच्या दुधावरच चालतो.

घरातील सानथोर माणसं छावणीवर जनावरांच्या देखरेखीसाठी राहिल्याने गावंच्या गावं उजाड दिसत आहेत. गावात दिवसा माणूस दिसत नाही. सकाळ संध्याकाळ डबा पोचवण्यासाठी जनांवरांचं दुध आणण्यासाठी छावणीवर जावं लागतं. छावणी गावापासून चार-पाच किमी अंतरावर. सकाळ संध्याकाळ प्रत्येकी ८ किमी असं त्यांचं चालणं होत आहे.

मुलींना घरच्या कामासाठी व पाण्यासाठी पालक शाळेत पाठवित नाहीत. काहीजणं सहकुटूंब या छावणीवर राहात असल्यानं मुलांना शाळेत जा ये करणं खूप कष्टाचं होत आहे. मुला मुलींना कॉलेजला पाठवायचं म्हणजे बस पास आला.

दूषित पाण्यामुळे सर्वांच्याच अनारोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. उलटी, जुलाब, अशक्तपणा असे विकार बळावलेत. पाण्याचा साठा करून ठेवल्यामुळे चिकूनगुनीया, मलेरिया असे आजार मोठ्या प्रमाणात गावागावात दिसून येत आहेत. पाणी नाही म्हणून काही माणसांनी जिथं आपली जनावरे चक्क सोडून दिली तिथं जनांवराचं आजरपण बघण्यासाठी त्यांच्याकडे कुठून पैसा असणार आहे? एवढंच नाही तर मुलींची बाळंतपणं सुद्धा चाराछावणी वरच होत आहेत. खरं तर या दुष्काळाने माणसांना उघड्यावर आणलं आहे हेच खरं. आणखी एक म्हंजे येथील मुलांना लग्नासाठी मुली मिळेनाशा झाल्यात. कारण बेरोजगारी आणि पाण्याचा मोठा प्रश्न.

चोऱ्यांचं प्रमाण वाढलं आहे. पाण्यासाठी भटकताना, गुरे चारण्यासाठी जातायेता स्त्रियांचे दागिने पळवले जात आहेत. विशेषतः मुलींना खूप संभाळावे लागत आहे. ही खूप मोठी समस्या झाली आहे. हे जाणून घेताना लोक किती अडचणींवर मात करत जगत आहेत हेच समजतं, अशा परिस्थितीतही माणसं जगण्यासाठी धडपडत आहेत. अजूनही माणसे मोडून पडली नाहीत तर उद्याच्या आशेवरती जगताहेत.

तनुजा तांबोळी ता. माण जि. सातारा

## ता. सांगोला जि. सोलापूर

दुष्काळ जणू आमच्या पाचवीलाच पुजला आहे. तालुक्यात १०५ गावं आहेत पैकी ५१ गावं आज टँकरवर अवलंबून आहेत. दुष्काळाच्या झळांत विशेषतः मुली आणि स्त्रियांची होरपळ होत आहे. शाळेकडं पाठ फिरवून मुलींना टँकरमागे धावावं लागंत आहे. वाड्यावस्त्यांवर रहाणारी माणसांची परेशानी तर विचारायलाच नको. विहिरी आटल्या तरी जीवघेणी कसरत करून बायाबापड्या विहिरींचा तळ ढवळून काढंत आहेत. काखेला लेकरू आणि डोईवर दोनदोन मोठाले हांडे. अशा परिस्थितीत दुखणं आलंच तर अंगावर काढण्यावाचून स्त्रियांना पर्याय नाही. दुष्काळात आजारावरील खर्चाचा तेरावा महिना कसा परवडणार हाच बायांचा विचार. खाजगी पेक्षा सरकारी परवडेल आणि इंजेक्शनपेक्षा एक रुपयाची गोळी बरी म्हणून नर्सबाईची वाट बघावी म्हटली तर ती आठआठ दिवस येतच नाही. दवाखान्यात गेलं तरं नेहमीचा औषधाचा तुटवडा.

दुष्काळ म्हणजे चारा छावण्या आणि टँकर येवढंच समीकरण आमच्या राजकारण्यांना कळतं. चार तासांच्या मिटिंगीत साडेतीन तास चारा छावणी व टँकरवर चर्चा आणि आरोग्याच्या प्रश्नाला पाच मिनिटं. तालुक्यातील ९३ पैकी ७२ छावण्यांना शासनाने अनियमिततेबद्दल नोटीसा बजावल्या आहेत. रोजगार हमीची आजही अवघड परिस्थिती आहे. रोजगार हमी, काम कमी. अर्ध तुम्ही, अर्ध आम्ही हेच वास्तव आजही आहे.

ॲड. सुनिता धनवडे ता. सांगोला जि. सोलापूर

चालू घडामोडी

# न्या. जे एस वर्मा समितीच्या अहवालातील स्त्री हक्कांची सनद

दिल्लीत डिसेंबरमध्ये झालेल्या सामुहिक बलात्काराच्या घटनेनंतर उसळलेल्या जनक्षोभाची दखल घेऊन सरकारने तडकाफडकीने न्या. जे एस वर्मा समिती स्थापन केली. या समितीला स्त्रियांवरील हिंसेशी आणि लैंगिक अत्याचारांशी संबंधित भारतीय दंड विधानातील फौजदारी कायद्यात सुधारणा आणि दुरुस्त्या सुचवून तीस दिवसांच्या आत रिपोर्ट सादर करायला सांगितलं गेलं. न्या. वर्मा आणि त्यांच्या टीमने २९ दिवसांमध्ये जवळपास ८०,००० सूचनांचा, ज्या त्यांनी समाजातील विविध संस्था संघटना आणि लोकांकडून मागवल्या होत्या, अभ्यास करून आपला अहवाल सादर केला.

वर्मा समितीने या एक महिन्याच्या तोकड्या कालावधीतही स्त्रियांवरील अत्याचारांची योग्य आणि सकारात्मक दृष्टीकोनातून दखल घेऊन एक परिपूर्ण अहवाल आणि चांगल्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत. परंतु त्यावर आधारित अध्यादेश जारी झाल्यानंतर हे स्पष्टच झालं की सरकारने अहवाल पूर्णपणे न स्वीकारता त्यातील आपल्या सोईच्या सुधारणांचा स्विकार केला आणि राजकीयदृष्ट्या अडचणीच्या सुधारणांना केराची टोपली दाखविली. उदा. स्त्रियांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये शासनाची जबाबदारी, संस्थांतर्गत (पोलीस स्टेशन, आधारगृह, तुरुंग, दवाखाना) होणाऱ्या बलात्कारात सामिल असलेल्या अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या जबाबदार वरिष्ठांना शिक्षेची तरतूद, एएफएसपीए कायद्यातील बदल आणि सुरक्षा दलांच्या लोकांना फौजदारी कायद्याच्या कक्षेत आणण्यासंबंधातील तरतूद, तसेच स्त्रीच्या लैंगिक संबंधातील स्वनिर्णयाच्या अधिकाराचा मुद्दा, विवाहांतर्गत होणाऱ्या बलात्काराचा मुद्दा, समलैंगिक आणि इतर समुहांशी संबंधित मुद्यांना या अध्यादेशात काहीही जागा दिलेली नाही.



वर्मा समितीने बलात्कारासाठी जास्तीत जास्त जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद केली असताना सरकाने मात्र या विषयावर सध्या असलेल्या जनारोषाचा आधार घेऊन फाशीच्या शिक्षेची तरतूद मात्र केली आहे.

या लेखात आम्ही आमच्या वाचकांसाठी वर्मा समितीने आपल्या अहवालात स्त्रियांच्या हक्कांची एक सनद सादर केली आहे ती देत आहोत.

## सनदेचा उद्देश

भारतीय संविधानाने स्त्रियांसाठी सुनिश्चित केलेले हक्क आणि अधिकार अधोरेखित करण्यासाठी आणि त्या विविध हक्क आणि अधिकारांचं रुपांतर न्यायामध्ये होण्याच्या आवश्यकतेसाठी ही सनद लिहिली जात आहे.

ही सनद सीडॉ करार (कन्वेंशन ऑन दी एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेन्स्ट विमेन) तसेच आंतरराष्ट्रीय नागरी आणि राजकीय अधिकार करारासारख्या आंतरराष्ट्रीय परिषदांप्रति भारताची वचनबद्धता आणि बांधिलकी लक्षात घेऊन लिहिली जात आहे.

लिंगभावावर आधारित ऐतिहासिक भेदभाव, बंधनं आणि नाकारलं जाण्याचं वास्तव मान्य करतानाच काही विशिष्ट व्यवहार पद्धती तसेच सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि पारंपारिक चालीरीति या मुळात पितृसत्ताक आहेत, स्त्रियांना कमी लेखणाऱ्या, त्यांच्या सन्मानाला ठेच पोचवणाऱ्या आहेत याची दखल घेण्याच्या उद्देशाने ही सनद लिहीत आहोत.

मुली व स्त्रियांच्या विकासाच्या आड येणाऱ्या आणि त्यांच्या शारीरिक तसेच मानसिक विकासाला मारक ठरणाऱ्या कुठल्याही गोष्टीचा धिक्कार व्हायला हवा तसेच अशा प्रथा परंपरा नष्ट व्हायला हव्यात या ठाम निश्चयाने ही सनद लिहिली जात आहे.

स्त्रियांना त्यांच्या हक्कांचा योग्य उपयोग करता यावा आणि त्यांना त्यांचा पुरेपुर फायदा मिळावा म्हणून त्या अधिकारांचं संवर्धन-संरक्षण होण्यासाठी आणि ते अबाधित राखले जाण्यासाठी आम्ही दृढनिश्चयी आहोत.

## भाग १

## जगण्याचा अधिकार, सुरक्षा आणि शरीर मनाची एकात्मता, स्वयंभूपणा –

१. प्रत्येक स्त्रीला सुरक्षित, स्वयंपूर्ण आणि आदराने जीवन जगण्याचा अधिकार हवा. स्त्रियांवर होणाऱ्या सर्व प्रकारच्या हिंसा, शोषण, क्रुर, अमानवी आणि मानहानीकारक शिक्षा व वर्तणूक यांच्यावर बंदी हवी.

२. प्रत्येक स्त्रीला मानवांची अंगीभूत प्रतिष्ठा असण्याचा अधिकार आहे. प्रत्येक स्त्रीला तिच्या मानवी हक्क आणि कायदेशीर अधिकारांचं संरक्षण आणि संवर्धन करण्याचा अधिकार आहे.

३. प्रत्येक स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून आदराने वागवलं जाण्याचा अधिकार आहे आणि तिच्या व्यक्तीमत्वाचा मुक्त विकास करण्याचा अधिकार आहे.

४. प्रत्येक स्त्रीला आपली लैंगिक स्वतंत्रता पूर्णपणे व्यक्त करण्याचा आणि अनुभवन्याचा अधिकार आहे तसेच नातेसंबंध प्रस्थापित करण्याचा आणि जोडीदार निवडण्याचा ही तिला अधिकार आहे.

५. प्रत्येक स्त्रीला तिच्या संमती शिवाय एखाद्या वैद्यकीय किंवा वैज्ञानिक प्रयोगांमध्ये सामिल होणं नाकारण्याचा, एखाद्या आणीबाणीच्या किंवा अतिशय निकडीच्या प्रसंगांचा अपवाद वगळता, अधिकार आहे.

६. खाजगी वा सार्वजनिक जागी होणाऱ्या सर्व प्रकारच्या हिंसेपासून स्त्रियांना सुरक्षिततेची खात्री देण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्यातच जबरदस्तीने किंवा इच्छेविरुद्ध केले जाणारे शरीर संबंध किंवा तत्सम वर्तनाचा समावेश आहे.

७. देह व्यापार किंवा अशा प्रकारच्या इतर अनेक धोक्यांना बळी पडलेल्या किंवा तशी शक्यता असणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या सुरक्षेची, बचावाची आणि पुनर्वसनाची जबाबदारी शासनाची आहे.

८. शासनाने प्रत्येक हिंसा पीडित स्त्रीला तिच्या मदतीसाठी उपयुक्त अशी माहिती देणाऱ्या, भरपाई देणाऱ्या, पुनर्वसनात मदतकारक अशा आणि सुलभपणे उपलब्ध असणाऱ्या संदर्भसेवा आणि यंत्रणांची वेळेत पूर्तता करून द्यायला हवी.

## भाग २

## लोकाशाहीवादी आणि नागरिकत्वाचे अधिकार

९. प्रत्येक स्त्रीला सहभागी पद्धतीने चालणाऱ्या शासन-प्रशासनाचा अधिकार असायला हवा आणि त्यात निवडणुकीच्या माध्यमातून, कुठल्याही प्रकारचा भेदभाव न होता, सहभागी होण्याचाही अधिकार असायला हवा. निवडणूकीच्या प्रक्रियेत स्त्रियांना सर्व स्तरांवर प्रतिनिधीत्व मिळायला हवं. तसेच निर्णय प्रक्रिया आणि विकास व आर्थिक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये भागीदार होण्याची समान संधी मिळायला हवी.

१०. प्रत्येक स्त्रीला विचार करण्याच्या स्वातंत्र्याचा, सदसद्‌विवेक, धर्म आणि श्रद्धांच्या स्वातंत्र्याचा अधिकार आहे. तसेच कुठल्याही बाह्य हस्तक्षेप आणि ढवळाढवळीशिवाय विशिष्ट मत राखण्याचा, मतमातांतराचा व ते बदलण्याचा अधिकार आहे.

११. प्रत्येक स्त्रीला, तिच्या धर्माचं किंवा श्रद्धांचं उपासना, सण समारंभ, रीतिरिवाज, कल्पना किंवा तिने निवडलेल्या मतांच्या माध्यमातून, व्यक्तिगतपणे किंवा समुहातील इतरांसोबत, खाजगी किंवा सार्वजनिक जागेत प्रकटीकरण करता येण्याचा अधिकार आहे.

१२. प्रत्येक स्त्रीला आपले विचार व्यक्त करण्याचं स्वातंत्र्य आहे. तो तिचा अधिकार आहे. कोणतीही आणि कुठल्याही स्वरूपातील माहिती किंवा विचारांचा शोध, ते मिळवणे आणि ते इतरांना देण्याचा अधिकार प्रत्येक स्त्रीला आहे.

१३. प्रत्येक स्त्रीला शांततेच्या मार्गाने एकत्र येण्याचं स्वातंत्र्य आहे. तो तिचा अधिकार आहे.

१४. प्रत्येक स्त्रीला कुठल्याही समूह संघटनेशी जुडण्याचं स्वातंत्र्य आहे. तो तिचा अधिकार आहे.

## भाग ३

## समानता आणि भेदभावापासून मुक्ती

१५. प्रत्येक स्त्रीला कायद्यासमोर समान असण्याचा अधिकार आहे आणि सर्व कयद्यांचं समान संरक्षण तिला मिळालं पाहिजे. तो तिचा अधिकार आहे.

१६. कुठल्याही स्त्रीवर ती बाई आहे म्हणून अन्याय किंवा भेदभाव व्हायला नको. उदा.

१. स्त्रियांना कौटुंबिक मालमत्तेमध्ये वारसा हक्क नाकारणे.

२. (ब.) स्त्रियांना प्रतिष्ठा नाकारणाऱ्या, स्त्री-पुरुषांमधील समानता नाकारणाऱ्या किंवा मुलींच्या सन्मानाला आणि हिताला मारक अशा कुठल्याही धार्मिक, पारंपारिक चालीरीति.

३. जमीनजुमला, वित्त आणि इतर संसाधनांच्या पर्यंत स्त्रियांची पोहोच मर्यादित करणारं एखादं धोरण किवा एखादी कृती.

४. गर्भधारणेच्या आधारावर भेदभाव करणे

५. आरोग्य सेवा, शिक्षण आणि इतर कल्याणकारक योजनांच्या प्रति स्त्रियांची पोहोच मर्यादित करणे

६. नोकरी किंवा अल्पकालीन सेवेची संधी नाकारणे. जात, धर्म, वर्ण इ. आधारांवर भेदभाव करणे.

७. मजुरी किंवा अल्पकालीन संधी उपलब्ध करण्याच्या पद्धतींमधील असमानता

८. लिंगावर आधारित कामाच्या विभागणीमुळे संपूर्ण रचनेमध्ये स्त्रियांसाठी उपलब्ध असणाऱ्या संधींमध्ये असमानता

९. किंवा एखाद्या समुहाकडून इतर जाती-पोटजातीच्या, धर्म, प्रदेश किंवा वर्णाच्या स्त्रीवर पवित्र अपवित्रतेच्या कल्पनांच्या आधारे भेदभाव होणे.

१७. प्रत्येक स्त्रीला आपल्या इच्छेनुसार व पसंतीचा जोडीदार निवडण्याचं स्वातंत्र्य असायला हवं आणि लग्नांतर्गत व्यवहारांमध्ये समान जोडीदाराप्रमाणे वागवलं जायला हवं.

१८. प्रत्येक स्त्रीला पुरुषाप्रमाणेच विभक्त होण्याचा, घटस्फोट घेण्याचा आणि लग्न रद्द करण्याचा अधिकार असायला हवा.

१९. प्रत्येक स्त्रीला पदवीपर्यंत मोफत शिक्षणाचा अधिकार असायला हवा.

२०. प्रत्येक स्त्री आणि विशेषतः मुलींना शाळा किंवा इतर शैक्षणिक संस्थांमधील लैंगिक शोषण आणि इतर सर्व प्रकारच्या अत्याचारांपासून संरक्षण मिळायला हवं आणि अशा कृत्यामध्ये सामिल दोषी व्यक्तींना तत्काळ शिक्षा व्हायला हवी.

२१. अत्याचार आणि लैंगिक शोषणाने पीडित प्रत्येक स्त्रीला समुपदेशन आणि पुनर्वसन सेवांचा लाभ मिळायला हवा.

२२. प्रत्येक स्त्रीला प्रजनन आरोग्य आणि लैंगिक आरोग्याचा अधिकार असायला हवा.

२३. प्रत्येक स्त्रीला पोषक आणि पुरेसा आहार मिळण्याचा अधिकार असायला हवा तसेच तिला पिण्यासाठी शुद्ध पाणीही मिळायला हवं.




## भाग ४
## सुरक्षित जागा आणि अवकाशाचा अधिकार

२४. प्रत्येक स्त्रीला घर किंवा निवारा असण्यचा समान अधिकार असायला हवा तसेच जगण्यासाठी आवश्यक किमान मूलभूत सेवा सुविधांचा अधिकार असायला हवा.

२५. प्रत्येक स्त्रीला, मग तिचा विवाह झाला असेल किंवा नसेल, घर किंवा पुरेशा निवाऱ्याचा अधिकार आहे.

२६. प्रत्येक स्त्रीला सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या उपयोगाचा अधिकार असायल हवा. त्यात छेडछाड, विनयभंग किंवा पाठलागासारखे तिच्या सन्मानाचा भंग करणारे प्रसंग तिच्यावर येता कामा नयेत.

## भाग ५
## विशेष सुरक्षा

२७. प्रत्येक प्रौढ स्त्रीला तिच्या शारीरिक, आर्थिक आणि सामाजिक गरजांना अनुसरून आणि रोजगार व व्यावसायिक प्रशिक्षणाशी संबंधित विशेष संधी आणि सेवा सुविधा उपलब्ध असयलाच हव्यात.

२८. प्रत्येक स्त्रीला लैंगिक अत्याचार, वयावर आधारित भेदभावासारख्या इतर सर्व प्रकारच्या हिंसा मुक्त जीवनाचा अधिकार असायला हवा. तसेच सन्मानाने वागवलं जाण्याचाही अधिकार असायलाच हवा.

२९. प्रत्येक अपंग आणि विशेष गरजा असणाऱ्या स्त्रीला विशेष संरक्षणाचा अधिकार असायला हवा. तसेच तिच्या शारीरिक, आर्थिक आणि सामाजिक गरजांना अनुसरून रोजगार आणि व्यावसायिक प्रशिक्षणाशी संबंधित तसेच त्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग सुनिश्चित करणाऱ्या विशेष संधी आणि सेवा सुविधा उपलब्ध असयलाच हव्यात.

३०. प्रत्येक अपंग आणि विशेष गरजा असणाऱ्या स्त्रीला लैंगिक अत्याचार, भेदभाव आणि हिंसा मुक्त जीवनाचा अधिकार असायला हवा. तसेच सन्मानाने वागवलं जाण्याचाही अधिकार असायलाच हवा.

## भाग ६
## पीडित स्त्रियांसाठी विशेष संरक्षण

३१. दारिद्र्य रेषेखालच्या सर्व स्त्रिया, विशेषतः मागासवर्गीय लोक समूहांसोबतच इतर समूहांमधील कुटुंबप्रमुख स्त्रिया आपल्या विशेष भौतिक, आर्थिक आणि सामाजिक गरजा भागवण्यात सक्षम असायलाच हव्यात.

३२. प्रत्येक गर्भवती स्त्री किंवा स्तनादा माता किंवा अटकेत असलेल्या स्त्रीला तिच्या स्थितीला अनुरूप व योग्य असं पर्यावरण पुरवलं जायला हवं आणि तिला मानाने वागवलं जाण्याची खात्री दिली जायलाच हवी.

चा
लू
घ
डा
मो
डी

# विचार बलात्काराचा आणि त्याबाबत भूमिकांचा

**फ्लाविया ॲग्नेस**

*मागचं वर्ष संपता संपता दिल्लीत एका २३ वर्षाच्या मुलीवर निर्घृण हल्ला आणि बलात्कार झाला. त्यानंतर या विषयावर चर्चा सुरू झाली आणि आंदोलनही झालं. मात्र या सर्व चर्चेतून अशा हिंसेबाबत बाबत अगदी सोपे, झटपट उपाय सुचवले गेले, शिक्षांची मागणी करण्यात आली. स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेचं गांभीर्य आणि त्यातली गुंतागुंत लक्षात न घेता चर्चा झडत राहिल्या. मात्र या सर्व चर्चांमधील काही मुद्द्यांवर गंभीर चर्चा होणं गरजेचं आहे. बलात्कार म्हणजे मृत्यूहून भयंकर, किंवा कितीही नित्याने घडत असल्या तरी काही प्रकारच्या हिंसेला दुर्मिळ आणि म्हणून गंभीर ठरवणं, घरात घडणाऱ्या लैंगिक हिंसेकडे पूर्णपणे काणाडोळा करणं अशा अनेक बाबींचा खोलात विचार करणं आवश्यक आहे.*

निर्भया, दामिनी, ब्रेव्हहार्ट, भारताची कन्या अशी बिरुदं लावलेली दिल्लीतील २३ वर्षांची मुलगी अखेर तिच्यावरच्या अत्याचारांना बळी पडली. स्त्रियांना बलात्काराच्या बळी न म्हणता त्यांना *सर्वायवर*, म्हणजेच अत्याचार सहन करूनही त्यातून बाहेर पडलेल्या स्त्रिया म्हणून त्यांचा विचार करण्यात यावा असं आम्ही सतत म्हणत असतो. पण या मुलीच्या बाबतीत काही ते म्हणता येत नाही कारण ती खरंच बळी पडली. आपल्यापैकी बहुतेकींची इच्छा होती तिनं जगावं अशी...ती खरंच जगली असती तर स्त्रियांवरील हिसंविरोधातील आंदोलनाची ती प्रतीक ठरली असती. तिने उघडपणे आपल्यावरच्या हिंसेचा विरोध केला असता. आणि बलात्कार झाल्यावर स्त्रिया म्हणजे 'जिंदा लाश' ही आपल्या संसदपटूंची धारणा तिने खोटी ठरवली असती. तिच्याकडून प्रेरणा घेऊन अनेक तरुण मुलींनी स्वतःवर झालेल्या लैंगिक अत्याचारांना वाचा फोडली असती. मात्र आता हे सर्व करण्याची जबाबदारी तिच्यासाठी आंदोलन करणाऱ्यांवर आणि आपल्या राजकारण्यांवर येऊन पडली आहे.

### बलात्कार झालेली स्त्री म्हणजे मृतवत/जिवंत प्रेत नाही

सध्या होत असलेल्या चर्चा पाहता बलात्काऱ्यांना फाशी देण्याची आंदोलकांची मागणी दुर्दैवाने पूर्ण होताना दिसतीये. या पलिकडे बलात्काराबाबतच्या कायद्यामध्ये फार ठोस बदल करण्यात आलेले नाहीत. तिच्या मृत्यूमुळे बलात्कार आणि खून असं कलम लागल्याने हा गुन्हा दुर्मिळात दुर्मिळ ठरेल. पण फाशी ही शिक्षा आपण मान्य केली तर तिचा जगण्यासाठीचा झगडा वाया जाईल. तिने स्वतःची जगण्याची, काम करण्याची, आपल्या कुटुंबाला आधार देण्याची इच्छा स्पष्टपणे व्यक्त केली होती. तिला 'जिंदा लाश' म्हणणं हा तिचा मोठा अपमान आहे. त्यामुळे आपण असे शब्द वापरणं आता तरी थांबवायला हवं.

या घटनेने बलात्काराच्या कायद्यामध्ये सुधारणा आणण्याबाबत हालचाली सुरू झाल्या, तशा मागण्या होऊ लागल्या ही एक जमेची बाजू मानायला हवी. मात्र त्यातून झटपट उत्तरं मिळवण्याचा प्रयत्न मात्र होऊ नये. बदला किंवा जशास तसे या धारणेतून न्यायाची मांडणी होणं घातक आहे. फाशीची, भर चौकात फासावर लटकवण्याची मागणी, लिंगविच्छेद (पुरुषाचं लिंग कापून टाकणे, निकामी करणे)अशा झटपट न्यायाच्या कल्पना आपण तपासून पहायला हव्यात. दिल्लीच्या घटनेत संबंधित मुलीच्या योनिमार्गात लोखंडी सळया घुसवल्याने आतड्यांना गंभीर इजा झाली आणि त्यातून तिच्या सगळ्या महत्वाच्या अवयवांना विषारी लागण झाली हे तिच्या मृत्यूचं मुख्य कारण आहे. योनिमार्गात काठ्या, सुऱ्या, लोखंडी कांब, बाटल्या अशा कोणत्याही वस्तू जेव्हा घुसवल्या जातात तेव्हा त्यातून होणारी इजा जास्त गंभीर असते. मात्र अशा कृत्यांना तितकीच गंभीर शिक्षा केली जात नाही कारण असा हल्ला बलात्काराप्रमाणे 'मरणाहून वाईट' मानला जात नाही. लहान मुलांवरील अत्याचारांमध्ये किंवा जातीय, धार्मिक दंगलीमध्ये स्त्रियांवर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये असे प्रकार मोठ्या प्रमाणावर होतात. त्यामुळे लैंगिक अत्याचारांचा विचार करताना बलात्काराला (पुरुषाने त्याचे लिंग स्त्रीच्या योनीत जबरीने घालणे) इतर प्रकारच्या हल्ल्यांपेक्षा वेगळा दर्जा देण्याची आपली पुरुषी मानसिकता सोडून द्यायला पाहिजे.

स्त्रीवर हल्ला करताना केवळ योनीला लक्ष्य केलं जात नाही. ॲसिड फेकणे, चेहऱ्यावर वार, कपडे फाडून नग्न धिंड काढणे, जमिनीवर पाडून पोटात लाथा मारणे या सर्व प्रकारातून स्त्रियांना त्यांची समाजातली जागा दाखवण्याचा प्रयत्न केला जात असतो. दिल्लीतील घटनेविरोधात देशभर जोरात आंदोलनं केली जात असताना मुंबईमध्ये एका मुलाने आपल्या मैत्रिणीवर चाकूने अनेक

वार केले आणि स्वतःला भोसकलं. तो जागीच मरण पावला, मुलीने काही दिवसांनी प्राण सोडला. हा हल्लाही तितकाच निर्घृण आणि गंभीर होता.

## हिंसा नित्याचीच

स्त्रियांवर विविध प्रकारे हिंसा केली जात असते. त्या सर्वांवर बलात्काऱ्यांचा लिंगविच्छेद हे उत्तर असू शकत नाही. स्त्रीची योनिशुचिता सर्वात महत्वाची आणि म्हणूनच बलात्कार हा मृत्यूहूनही गंभीर अशा धारणा पुरुषसत्ताक मानसिकतेतून तयार झाल्या आहेत. या धारणांचा विचार करता 'हिंसा करणाऱ्यांचे हात पाय तोडा' या पुराण्या शिक्षांच्या मार्गाने आपण जाणार आहोत का? आणि रोजच आपल्या घरांमध्ये, रस्त्यावर, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या हिंसेसंदर्भात आपण काय भूमिका घेणार?

या घटनेसंदर्भात अजून एक विचार मनात येतो. जर या मुलीवर बलात्कार झाला नसता आणि तिला आणि तिच्या मित्राला फक्त लोखंडी सळयांनी मारहाण झाली असती तर इतका मोठा उद्रेक उसळला असता का? बलात्कार आणि त्याच्याशी संबंधित मसालेदार चर्चांमुळे इतकी सहानुभूती आणि बदल्याची भावना निर्माण झाली नसेल ना?

इतक्यात घडलेल्या सामूहिक बलात्काराच्या इतर घटनांमध्येही हे दिसून आलं आहे की घटनेच्या वेळी मुली त्यांच्या मित्रांबरोबर होत्या. तरुण मुलींनी स्वतःची लैंगिकता, स्वतःचे लैंगिक स्वातंत्र्य उपभोगणे हे पचनी न पडल्याने तर त्यांच्यावर असे हल्ले होत नाहीयेत? बंगलोरच्या नॅशनल लॉ स्कूलच्या एका विद्यार्थिनीवर ती रात्री तिच्या मित्राबरोबर असताना हल्ला आणि बलात्कार करण्यात आला होता. आणि तिच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनाही गुन्ह्यासंबंधी महत्वाचे पुरावे गोळा करण्यापेक्षा तिचा योनिमार्ग किती लवचिक आहे यामध्ये जास्त रस होता. २०१० साली मंगलोर शहराजवळ एक हिंदू मुलगी तिच्या मुस्लिम मित्राबरोबर बसने जात असताना एका कडव्या हिंदू संघटनेच्या लोकांनी तिला बसमधून बाहेर काढलं आणि पोलिस स्टेशनमध्ये नेलं. तिच्या मित्राविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. तिच्या वडिलांना पोलिस ठाण्यात बोलवून घेण्यात आलं आणि तिथे त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आली. त्या रात्री त्या मुलीने आत्महत्या केली.

या सगळ्या घटना आणि दिल्लीच्या घटनेतून सर्व तरुण मुलींना 'रात्री अपरात्री फिरु नका, आणि मित्रांबरोबर तर नाहीच...' असा इशारा देण्याचा प्रयत्न तर केला जात नाहीये? घरचे लोक, समाज मुलींना हेच तर सांगत असतो. आपल्या राज्याच्या गृहमंत्र्यांच्या आदेशावरुन स्वतःला नैतिकतेचे रक्षक समजणारे जेव्हा प्रेमी जोडप्यांवर धाडी घालतात तेव्हा हेच बजावत असतात. मात्र त्यांना किंवा आर. आर. पाटलांना हे माहित नसावं की बलात्काराच्या एकूण नोंद घटनांपैकी एक तृतीयांश केसेस मुलगी स्वतःच्या मर्जीने मित्राबरोबर पळून गेल्यास तिच्या पालकांनी त्या मुलाविरोधात दाखल केल्या आहेत. आता लहान मुलांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीनंतर लैंगिक संबंधासाठी संमतीचं वय १८ वरून १६ करण्यात आलं आहे. त्यामुळे अशा केसेसमध्ये वाढ होणार आहे. लैंगिक संबंध असणाऱ्या तरुण मुला-मुलींना कुटुंब आणि शासन या दोघांकडून त्रास होण्याची शक्यता वाढणार आहे.

## चुकीच्या धारणा

बलात्कार निर्जन ठिकाणी, एकटं असताना अनोळखी व्यक्तींकडून होतात, बलात्कार करणारे विकृत असतात आणि त्यांना फाशीच द्यायला पाहिजे अशा धारणा दिल्लीच्या घटनेनंतर बळावत गेल्या आहेत. पण बहुतेक बलात्कार घराच्या चार भिंतीत किंवा शाळांमध्ये होत असतात. नातेवाइकांनी केलेले बलात्कार बहुतेक वेळा लपवले जातात. मुलगी गरोदर राहिली आणि गर्भपात करता येणार नसेल तरच त्यांना वाचा फुटते. मुंबईत एक पुरुष त्याच्या मुलीवर दोन वर्षं बलात्कार करत होता. मुलीने आईकडे तक्रार केल्यावर तिने नवऱ्याला जाब विचारला. पण त्याने तिला सोडून देण्याची धमकी देऊन गप्प केलं. मुलीच्या मामाला हा प्रकार कळल्यावर त्याने त्यात लक्ष घातलं आणि केस नोंदवली, पण भीतीपोटी आईने कोर्टात येऊन साक्ष दिली नाही. अशाच अजून एका घटनेत पोलिसांनी तीन वेळा तक्रार घेण्यास नकार दिला. अखेर स्थानिक सामाजिक कार्यकर्तीच्या हस्तक्षेपानंतर केस नोंदवून घेण्यात आली. वडील आणि मुलगी या नात्याला काळिमा फासणाऱ्यांना काय शिक्षा करायची? आणि जे अशा गुन्ह्याबाबत मूग गिळून बसतात किंवा दुर्लक्ष करतात त्यांना?

सत्तरीच्या दशकात घडलेली मथुरा बलात्कार केस देशभरात बलात्काराविरोधात आंदोलनास कारणीभूत ठरली. मथुरा नावाच्या १७ वर्षीय मुलीवर दोन पोलिसांनी पोलिस ठाण्यात बलात्कार केला. मात्र सुप्रीम कोर्टाने तिच्या शरीरावर विरोधाच्या कसल्याच खुणा दिसत नाहीत त्यामुळे तिची संमती असणार असं गृहित धरून त्या पोलिसांना निर्दोष मुक्त केलं. त्यासोबतच ती तिच्या मित्राबरोबर पळून गेली असल्याने ती कुमारी नव्हती, आणि म्हणूनच तिच्यावर बलात्कार होऊ शकत नाही अशी पुस्तीही जोडली. यानंतर झालेल्या आंदोलनाचा परिणाम म्हणजे बलात्कारासंबंधी कायद्यामध्ये काही सुधारणा करण्यात आल्या. कमीत कमी ७ वर्षे आणि जन्मठेपेपर्यंत शिक्षा हा त्यातला सर्वात महत्वाचा बदल. या

शिक्षेमुळे बलात्काराच्या घटनांना चाप बसेल अशी अपेक्षा होती. पण १९८३ पासून आतापर्यंत बलात्काराच्या घटनांचं प्रमाण वाढतच चाललं आहे. त्यामुळे कायद्यातील बदल बलात्कार थांबवू शकले नाहीत. गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा होण्याचं प्रमाण नगण्य असल्यासारखं आहे. त्यातही कमीत कमी शिक्षा देण्याकडेच खालच्या कोर्टांचा कल असतो. तीन वर्षं किंवा अगदी सहा महिनेदखील. त्यातही आरोपीने अपील दाखल केलं तर आरोपी सुटण्याची शक्यताच जास्त. मुंबईतली अभिनेता शायनी अहूजाची केस आणि त्यातील निकाल हा अपवाद मानायला हवा. फिर्यादीने जबाब फिरवला तरीही ट्रायल कोर्टाने फोरेन्सिक पुराव्यांच्या आधारे शिक्षा सुनावली. यात तफावत होती. आरोपीचं म्हणणं होतं की त्याचे त्याच्या घरी काम करणाऱ्या मुलीशी कसलेही आणि कधीच संबंध नव्हते. मात्र कोर्टात त्याच्या बाजूने असा दावा करण्यात आला होता की हे संबंध परस्पर संमतीने झालेले होते. अपील कोर्टात आरोपीची निर्दोष मुक्तता होण्याचीच शक्यता जास्त आहे. अशाच इतर तीन प्रसिद्ध व्यक्तींवरील खटल्यांमध्ये आरोपी निर्दोष मुक्त झाले आहेत.

### खोट्या केसेसचा बागुलबुवा

एखाद्या गरीब मुलीवर जेव्हा बलात्कार होतो तेव्हा अब्रूनुकसानीच्या भीतीने अनेकदा कुटुंबं दुसरीकडे रहायला जातात. मुलीची पाळी लांबल्याने उपचारासाठी दवाखान्यात नेल्यानंतर सत्य बाहेर येतं. पैशाअभावी मुलीला पुरेसे उपचारही मिळत नाहीत. बलात्कारानंतरच्या या गंभीर परिणामांचा मुकाबला करण्यासाठी भरपाईची आणि मदतीची गरज आहे. पण जेव्हा जेव्हा भरपाईबद्दल चर्चा होते तेव्हा प्रत्येक वेळी खोट्या केसेसचा मुद्दा पुढे केला जातो. महाराष्ट्रामध्ये दोन वर्षांपूर्वी जिल्हाधिकाऱ्याच्या अखत्यारीत काही जिल्हा बोर्ड स्थापन करण्यात आले होते. यावर गृह, कायदे आणि विधी, महिला व बाल विकास विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींची नेमणूक करण्यात आली. भरपाईसाठी आलेल्या अर्जांची छाननी करण्याचं काम बोर्डाला सोपवण्यात आलं होतं. पोलिसांनाही वैद्यकीय अहवाल आणि एफआयआरची प्रत पाठवण्याचे आदेश देण्यात आले होते. दोन लाख रुपये भरपाई निश्चित करण्यात आली होती. त्यातील २०,००० रुपये लगेच द्यावेत व बाकीच्या रकमेतील काही रक्कम मुलीने कोर्टात साक्ष दिल्यानंतर तसंच तिच्या वैद्यकीय उपचारासाठी, समुपदेशन आणि प्रशिक्षणासाठी देण्यात यावी असं ठरवण्यात आलं होतं. मात्र एवढ्या मोठ्या घोषणांनंतरही केंद्राने द्यायचा निधी राज्य शासनापर्यंत पोचलेला नाही. आधीच अन्याय झालेल्यांची ही क्रूर थट्टा आहे. कुणालाच प्रश्नाचं गांभीर्य समजत नाही कारण सर्वांच्याच मनात खोट्या केसेसची भीती आहे. दिल्लीतील घटनेत जर राज्य शासनाला लक्ष घालावं लागलं नसतं तर हॉस्पिटलचा खर्च तिच्या घरच्यांनी कसा केला असता? लैंगिक छळाच्या सर्वच पीडित मुली-स्त्रियांना भरपाई मिळावी या मागणीत काय गैर आहे?

खोट्या केसेसच्या शंकांचं भूत सर्वच व्यवस्थेच्या मानगुटीवर बसलं आहे. केस नोंदवण्यापासून ते कोर्टात केस उभी असतानादेखील सतत ही शंका डोकं वर काढत असते. तक्रार नोंदवणारा पोलिस, वैद्यकीय तपासणी करणारा डॉक्टर, फिर्यादीच्या बाजूने लढणारा सरकारी वकील, पीडित स्त्री किंवा मुलीचं चारित्र्य हनन करण्यासाठी उभा असणारा आरोपीचा वकील आणि निष्पक्ष न्याय देण्यासाठी नेमण्यात आलेला न्यायधीश या सर्वांच्याच मनात सतत फिर्यादी खोटं बोलत आहे का याचे पुरावे शोधण्याची वृत्ती दिसून येते. अशा परिस्थितीत जर शिक्षा जन्मठेप किंवा फाशीपर्यंत वाढवण्यात आली तर आता ज्या काही तुटपुंज्या खटल्यांमध्ये शिक्षा दिली जाते तिथेही आरोपीला बेनिफिट ऑफ डाउट (शंकेचा फायदा) दिला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### स्त्रियांना उत्तरदायी असणारी कायदेयंत्रणा

सध्याची फौजदारी न्याय यंत्रणा जबाबदारपणे वागते का, सर्वच स्तरावर काही नियम, तत्वं लागू आहेत का आणि सर्वात महत्वाचं म्हणजे हे नियम पाळले जातात का याचा तपास, मूल्यमापन केलं जातं का हे आता जास्त महत्वाचं आहे. आणि हे सर्व करण्यासाठी खोलात जाऊन विचार आणि कृती करायला लागणार आहे. लोकांच्या रेट्यामुळे फाशी किंवा लिंगविच्छेदासारखे उपाय आणले तर आताची लोकांची बदल्याची आग विझेल पण त्याचा प्रत्यक्षात बलात्काराच्या घटनांना आळा बसण्यासाठी अजिबात उपयोग होणार नाही. आपली कायदेव्यवस्था देशातील स्त्रियांना उत्तरदायी असेल यासाठी छोटे पण अर्थपूर्ण बदल करणं ही आताची खरी गरज आहे.

*फ्लाविया ॲग्नेस स्त्रियांच्या हक्कांवर काम करणाऱ्या वकील आहेत. तसंच त्या मजलिस या संस्थेच्या संचालक आहेत. मजलिस बलात्कार झालेल्या स्त्रियांसाठी आधार केंद्र चालवते.*

**मराठी रुपांतर – मेधा काळे**



पा
र
गा
व
च्या
पा
रा
व
रु
न

# कॅशच्या आधारावर जनता गॅसवर

समद्यास्नी पारागावावरनं बाबीचा राम राम. उन्हाचा कार लईच वाडलाय आमच्या पारगावात. तुमच्याकडं बी काय येगळी परस्थिती न्हाई हे आलंय माज्या कानावर. टीव्ही, पेपरात रोज तेच तर दावायला लागलेत. पान्यासाठी धाई दिशा ही तुमच्या परमानंच आमचीबी कथा हाय. माहेरच्या माणसाची बी कधी बगितली नसंल एवडी टँकरची वाट बगूलाल्यात गावोगावच्या बायाबापड्या. पान्याच्या या दुष्काळात आमच्या गावात चर्चा मातूर घासलेट, गॅस, आधार कार्ड आन बँकेत अकाऊंटचीच हाय. समदी लोकं दिवसा त्या आधार कार्डाच्या मागं आन रातीला पान्याच्या मागं पळतेत. परवा कोनतरी म्हनलं की आता आधार कर्डाबगर गॅस मिळनार न्हाई. तवा धरनं आमचा बाब्या आन मी खेट्याव खेटे मारू लालाव तालुक्याला. म्हागं तर आमच्या गावात मजाच झाली. कुटुन तरी वावडी उटली की आता ज्यच्याकडं आंधार कार्ड त्यलाच टँकरचं पानी मिळणार. लोंकायला कळंना की ह्याला आता हसावं का रडावं. पर खरं म्हनायचं तर मायबाप सरकारनं तुमच्या माज्यासारख्या समद्यावरच ही येळ आनली हाय. चला बगू आमच्या कमळी मंजुळीचा ह्यच्यावर काय इचार हाय ते...

मं- आत्या, आवं आत्या, कमळाबाई हाईती का घरात? का गेल्यात कुटं फिरायला?

आत्या- हाय की. ती कुटं जानार हाय. आमच्या सुनांला न्हाई माय बाहेर फिरण्याचा लई नाद. आन सासूवर लक्ष कोन ठेवनार. न्हाई मंजी काय लागलं, नको बगावं लागतंय, न्हाई का?

मं- आवं आत्या, कुटुन कुटं जाताव एका घडीत. मी आपलं सहज इचारलं.

आत्या- मीबी सहजच बोलले गं. आन आमची सून न्हाई जात कुटं फिराया. फिरन्यासाटी तिचा नवरा सोडलाय ना गावाला तिनं. त्यो पांढरा सदरा फिरतोय तेवडं लई हाय.

क. मंजुळे, आज इकडं कुटं वाट चुकली म्हनायची. ये की मदी. का दारातुनच बोलनार हाईस?

मं- आलोच की. आज काय माजं खरं न्हवतं बाय. बरं झालं तूच बाहेर आलीस ते. काय झालं काय आत्याबाईंला?

क- आगं काय न्हाई. आबांवर कावल्यात. ते बसलेत वागळेच्या पुडं आन ह्यंची देवयानी बुडायलीय. न्हाईतर ही काय वट्ट्यावर बसन्याची येळ न्हाई त्यंची. तू बस की.

म- कुटं बसू.

क. बस की त्या सिलिंडरवर.

म- सिलिंडरवर? जीव गेला का काय ह्यचा.

क- गेला? दोन महिने झालेत त्यला जाऊन.

मं- मंग. आनला न्हाई बदलून?

क- आगं त्यच्यामुळं तर आत्या कावल्यात आमच्या ह्यंच्यावर. रोज म्हनतेत आज आनतो, उद्या आनतो.

मं- मंग.

क- आगं मंग मंग काय. सिलिंडर कुटं दिऊ लालेत? ते म्हनतेत म्हनं तुमचा कोटा संपला. कोनतरी सांगितलं ब्लॅकमदी घ्या. आमचे हे म्हनले बगू मिरच्या बाजारात गेल्यावर. तवर भागवा सरपनावर. आता हे आत्यांला कोन सांगनार? तरी बरं आपल्याला सरपनाला काय कमी न्हाय.

मं- तुला सांगते कमळे...काय बी म्हन आपुन बरं नी आपलं गाव बरं बया.

क- आता... आगं बसतीस का उभ्यानंच बोलनार हाइस?

म- बसते... आन अदुगर माज्यासाठी च्या ठिव बरं.

क- हे काय आधन ठेवलंच हाय बग.

म- चांगला उकळून गरम करून दे बरका.

क- आता च्या काय थंड देनार हाय का मी? का घशातच गाळू?

म- कमळे, तुला सागते, दोन दीस पुन्याला गेलते नंदंकडं. तिथं समदंच थंडगार.. च्या काय अन कालवन कायं. जीव कटाळला बग.

क- का माय? इस्टू न्हाई का नंदंकडं?

म- हाय की... इस्टू हाय, पर त्यच्यात घालाया राकेल नगं?

क- इस्टूला राकेल लागतंय का? मला वाटलं घासलेट वापरतेत.

म- लईच चावट हाईस बग. अगं राकेलच गावंना झालंय् माय तिला. दिवसातला निम्मा येळ राकेलचंच बोलती बग माजी ननद. पूर्वी किती मिळायचं, आता कसं मिळना गेलंय, पांढरं काय नी निळं काय नी ब्लॅक काय. मला तर कट्टाळा आला बग ते राकेलपुरान ऐकून ऐकून.

क- आन् ग्यासची टाकी?
म- ती हाय शोभेला, न्हाय तर तुज्यासारकं स्टूल म्हनून बसायला.
क- म्हंजी?
म- अगं... तुज्यासारकीच तिची बी कथा. बंद केलाय म्हनं तिचा बी गॅस, दिना झालेत आता. पूर्वी लय मिरवायची माय. गेलं की झटकन लायटर काढायची की पटकन च्या तयार. धूर नको का आवाज नको.
क- खरंय माय. माजी बी जाव हाय ना लातुरात, पह्यलं पह्यलं लई नटायची बग त्या शेगडीला. यील त्याला पेटवून दावायची म्हनं. तिची गत बी तुज्या नंदंवानीच झालीया आता.
म- लई आबदा हाय बग. कार्डवाल्याला राकेल तरी मिळायलंय. बाकी लोकांची हालत लईच बेकार हाय. एका एका लिटरचा भाव ७० च्या पुडं गेलाय माय.
क- काय सांगतीस? अन् ग्यासची टाकी कितीला मिळायलीय तिथं?
म- अगं ह्या टाकीपायी भांडनंच व्हायचे राह्यलेत आता. माज्या पोराच्या पास होन्याची एक येळ गॅरंटी देता ईल पर ग्यासची टाकी गावल ह्यची काय गॅरंटी न्हाय माय.
क- का पैसे भरीनात का काय?
म- पैसे भरले, नंबर लावले, फॉर्म भरले पर ग्यास काय मिळंना बग. अन् कंपनीची गाडी आली की उटंती निसती झुंबड. पाण्याच्या टँकरला हुती ना आपल्यात तशीच तिथं त्या टाकीसाठी हुती बगं. अन् आता तर ते आधार कार्ड दावल्याबगर गॅस मिळनार न्हाई म्हनं.
क- आगं ते सोड. तू पुन्याला गेल्तीस तवा इतं गावात मज्ञाच झाली. गुरवाचा राम हाय ना पान्याच्या टँकरवर. त्याला वरच्या पाटलाच्या आळीला एके दिवशी टँकर न्ह्यायचाच न्हवता. तुला तर म्हाईतच हाय मागच्या निवडणूकीत त्यचं आन् पाटलाचं फाटलं ते. त्यनं उगंच वावडी उटवली आधार कार्डाबगर टँकरचं पानी मिळनार न्हाई म्हनून ते.
मं- मंग
क. मंग काय. पाटील आमच्या ह्यंच्याकडं आला रेशन कार्ड चालंल का इचारायला. (हासतात)
म- त्या आधार कार्डानं पागल केलंय बग. कुनी म्हनायलंय कार्ड नसंल तर ग्यासच न्हाई तर कुनी म्हनायलंय कार्ड न्हाई तर ग्यास म्हागनार म्हून.
क- आमचे हे तर म्हनाल्ते आता ग्यासच्या टाकीसाठी हजाराची नोट मोडावी लागनार हाय. सरपंच सांगायला होता न्हवं.
म- त्येच्याकडं हायती की चार चार टाक्या. त्याला काय जातंय बोलायला. पर त्या ग्यास न इस्टूपाई किती आबदा लोकावाची हुती. त्या पेक्षा आपली चूल बरी म्हनायची पाळी.
क- हां.. लई शानी हाइस. किती दिस धुरात काडायची गं? डोळ्यात धूर जाऊन आंधळी व्हशील तवा कळंल. आपलं एक येळ ठीक हाय पन शेरात कुटं मांडावी चूल आन् भारा कुटनं आनावा? हापिसातनं का कंपनीतनं?



म- अग माज्या नंदंची शेजारीन हाय ना, सैपाक पानी आटोपलं की हे.. मोटा बांबू घिऊन भाइर पडती अन् झाडांच्या फांद्या तोडून आन्ती बग. ती आन् तिच्या पोरीही. एवढाली लाकडं आनतेत माय. कुनी बंगलेवाल्यानी पकडलं तर समधीच मेहनत पान्यात जाती. पर लइ झटतात माय.

क- आत्ता शेरात बी चूल हायच् का?

म- का करावं माय. जिला लाकूड गावत न्हाई तिला दुसरा काय उपाय हाय. काईबी वापरावं लागतंय. कागद म्हनू नगं, पुठ्ठा म्हनू नगं, कापडाच्या चिंध्या म्हनू नगं आन कोळसा म्हनू नगं. अगं एकीच्या घरी तर इस्टुत डिजल भरलं व्हतं... हाय का जीवाशी खेळ.

क- चार घास शिजवाया यवढा तरास? आन् ती बी बायावांच्याच मागं हाय बगं गड्याला काय. ताटावर बसून ऑर्डर सोडायची.

म- मंग काय माज्या नंदंचं मिस्टर लय कावलं बग परवा. आंगुळीला गार पानी, च्या गार, जेवन गार... पर करत्येत काय? गेले मुकाट ते आधार कार्ड काढाया.

क- पर तीन टाक्या मिळायल्यात न्हवं?

म- अग पर त्या एकच महिन्यासाठी, उन्हाळ्यापासून गॅस लईच महाग व्हनार. टाकीला हाजाराची नोट आन् नंतर आपल्या बँकेत पैसे येनार.

क- आं... नवलाचंच बोलायलीस.

म- मंग... ज्याच्याकडे खातं न्हाई, आधार कार्ड न्हाई, त्येनी जास्त पैशे द्यायचे न्हाई तर गार च्या प्यायचा...

क- असंय् व्हय?

म- मंग.. जवा कवा पैशे खात्यात येतील तवा म्हनायचं कल्याण झालं आपलं. सरकारला याद आली.

क- पर मंजुळे बँकेत तर गडीच जातेत न्हवं... घरी थोडीच देनार हाइत पैशे...

म- मंग, न्हाई दिले की गार च्या पाजायचा आन् भाकरी बी कच्च्याच म्होरं सारायच्या, मंग देतील की...

क- उलटंच हाय माय समदं आदी म्हागाची टाकी घ्यायची आन् मग पैशे येनार.

म- आग पर मला सांग एकांद्यायेळेस पैशे आलेच न्हाइत तर टाकी कशी घ्यायची? मंग ती बी भेटती ब्लॅकनी... शेरात चुलीचा धूर न्हाई. पर समंद काळंच हाय बग रॉकेल बी न गॅस बी.

क- हं.. तुज्या बोलन्याच्या नादात च्या करपला बग, थांब दुसरा ठिवते.

म- ऱ्हाऊ दे माय.

क- आत्ता... चुलीच्या सरपनाचे पैसे द्यावे लागत न्हाईत मॅडम आजून. बसा च्या घिऊनच जा. गरम गरम....

**PRINTED MATTER** **बुक पोस्ट**

**प्रकाशक** **प्रति**

**तथापि ट्रस्ट**
रेणुप्रकाश ए, तिसरा मजला
बॅ. गाडगीळ रस्ता, नागनाथ पाराजवळ,
८१७, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरध्वनीः ०२० २४४३११०६/२४४३००५७
Email: tathapi@tathapi.org
Website: www.tathapi.org

अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही. अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर करता येईल.

पारगावच्या पारावरुन चित्रः राजू देशपांडे

**जिव्हाळा देणगी वर्गणी: वार्षिक – रु. ३५, तीन वर्षासाठी – रु. १००** **खाजगी वितरणासाठी**